Historicity Research Journal
Volume 1 | Issue 12 | Aug 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

चांगदेव (जळगाव) मंदिर प्रवेश सत्याग्रह (१९३१)

दिनेश रामदास महाजन

ला व विज्ञान महाविद्यालय, भालोद जि.जळगाव.

प्रस्तावना :-

चांगदेव येथील मंदिरहे प्राचीन मंदिर असून १२ व्या शतकात खानदेशात यादव राजांचे राज्य होते. यादव सम्राटाचा मांडलिक राजा गोविंद याने अनेक ठिकाणीहेमांडपंथी मंदिरे बांधली त्यापैकी चांगदेव हे एक मंदिर आहे.या मंदिराच्या मूळ गाभाऱ्यात महादेवाचे लिंग असल्याने या मूळ महादेव मंदिरात नंतर चांगदेवाची संगमरवरी प्रतिमा बसविण्यात आली असावी.या दगडी मंदिरात चुन्याशिवाय दगडांचा वापर करण्यात आला आहे.दगड घोटून व घडवून एकावर एक बसवून भिंती उभारल्यामुळे वास्तू फार मजबूत बनली आहे.सभागृहात सोळा स्तंभ व सोळा अर्थस्तंभ असूनसोळा स्तंभ चार भागात विभागल्याने आतील रचना गुढ वाटते.या स्तंभावर दगडी कडसाची योजना असावी.परंतु परचक्रामुळे किंवा राजकीय परिस्थितीमुळे काम अर्धवट सोडावे लागले असावे व नंतर शिखराचा भाग विटांचा बांधला असावा असे म्हटले जाते.

साधारण १९२७ पासून सार्वजनि मंदिरांमध्ये अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातीच्या लोकांनास्पृश्यांप्रमाणेचहक्क मिळायला हवेत अशा प्रकारच्या मागण्या येऊ लागल्या होत्या.त्याप्रमाणे महाराष्ट्रात आणि देशभरात मंदिर प्रवेश चळवळीला मोठी गती मिळालेली दिसून येते.पूर्वखानदेश जिल्हयातही अस्पृश्य वर्ग जागृतहोऊन आपल्या हक्काबाबत सजग झालेला दिसून येतो.पूर्वखानदेश (जळगाव) जिल्हयात असलेल्या चांगदेव (ता.मुक्ताईनगर) येथेही १९३१ मध्ये चांगदेव मंदिरात अस्पृश्यांनीसत्याग्रह केलेला दिसून येतो.

चांगदेव येथेअस्पृश्य मंदिरसत्याग्रह करणार असल्याचे प्रशासनास कळविण्यात आलेहोते.त्याप्रमाणेपूर्वखानदेश जिल्हा कलेक्टरच्या १० मे १९३० च्या गोपनीय पत्रातात्यांनी लिहीले आहे की, त्यांना अपेक्षा आहे की, महारसत्याग्रह लवकरच चांगदेव जे एदलाबाद (मुक्ताईनगर) पूर्वखानदेशमध्ये आहे. त्या मंदिरासमोर सुरु होईल. त्यांनी लिहिले आहे की, १५ मे १९३० रोजीसत्याग्रह एकदाचहोण्याची शक्यता आहे.कारण अस्पृश्यांशी चर्चेतून मार्ग निघेल व समझोताहोईल असा त्यांना विश्वास होता.कारणस्थानिक एदलाबादच्या (मुक्ताईनगर) महारांचासत्याग्रहींना पूर्णतः विरोध आहे.[१]

ठरल्याप्रमाणे चांगदेव मंदिरात अस्पृश्य बांधवांनी सत्याग्रह केला.परंतु ददैवाने तो फारसा यशस्वी होऊ शकला नाही.त्याबाबत पूर्वखानदेश कलेक्टरने २२ मे १९३० च्या पत्रात चांगदेव येथील महार लोकांचा मंदिरसत्याग्रह कसा अपयशी झाला याबाबत माहिती कळविलेली दिसून येते.ते या सत्याग्रहाबाबत म्हणतात की, त्यांनी (महार) लोकांनी अर्ज आणलेलाहोता. जो अगोदरच लिहिलेलाहोता. नदीच्या पात्रात बसून आणि विचार-विनिमय करुन या लोकांनीसहया केलेल्या होत्या.दोन प्रतिनिधींना पाठवून तो अर्ज कार्यालयात उपस्थित असणाऱ्या प्रमुखास द्यावा अशा सूचना त्यांना दिलेल्या होत्या.त्याप्रमाणेतोअर्ज पोलीस सब इन्स्पेक्टरलासादर करण्यात आला आणि लागलीच कार्यकर्ते निघून गेले.सब पोलीस इन्स्पेक्टरतोअर्ज असिस्टंट पोलीस इन्स्पेक्टरांकडे घेऊन गेला. अशा प्रकारेआपल्याकडेतो अर्ज येईल. दुसऱ्या गोष्टीसह त्या अर्जात म्हटले आहे की, मंदिर प्रवेशाची चळवळ प्रत्येक जिल्हयात सुरु केली जाईल. महारांनीसत्याग्रह करण्यासाठीपूर्वखानदेश मध्ये चांगदेव ठिकाण निवडले आणि त्याठिकाणीते जमले आहेत. जास्त कालावधीसाठी सत्याग्रह चालविण्यासाठी खुपसत्याग्रही त्यांच्याकडे नाहीत.हे त्यांना कळले आहे म्हणूनत्यांनीसत्याग्रह थांबविण्याचे ठरविले आणि थांबविलाही.या अर्जावर काही पुढाऱ्यांच्याहीसहयाहोत्या.

लेक्टरच्या पत्रानुसार, सत्याग्रहीमहार लोक नदीही ओलांडू शकले नाहीत. आणि चांगदेव मंदिराच्या बाजूला येण्यासाठीस्थानिक महारांनी त्यांना मदतही केली नाही. किंवा कार्यकर्त्यांचा पुरवठाही केला नाही.जेव्हा महार लोक त्या ठिकाणाहून निघून

ले, त्यावेळी एकाहेड कॉन्स्टेबलला त्या पार्टीसोबत पाठविले की, त्या ठिकाणीते निघून गेले किंवा परतच आले नाहीत.अशा प्रकारे पहिला मंदिर प्रवेशाचाप्रयत्न अस्पृश्यांचा शेवटास आला.[२]

पूर्वखानदेश कलेक्टरच्या १ जून १९३० च्या पत्रानुसार गव्हर्नर साहेबांना ते लिहितात, आपणास विनंती कि, २० मे चे पत्र आपण पहावे, ज्यात महारांनीसत्याग्रहाची धमकी देऊन चांगदेव मंदिराजवळ (पूर्वखानदेश) सत्याग्रह करणारहोते. परंतुतो नुकताच मागे घेण्यात आला. आपल्या सूचनेनुसार, असे धोरण अंमलात आणले जावे कीहा पेच प्रसंग सोडवतांना किंवा भविष्यात असे प्रसंग निर्माण झाल्यास सरकारने विचार करुन अशा बाबतीत विशेष अशी मार्गदर्शक तत्वे ही मागणीचे महत्व लक्षात घेऊन आणि विशेष करुन मंदिराचे महत्व लक्षात घेऊन करावे. म्हणूनहे अत्यंत गरजेचे आहे की, पहिल्या प्रसंगातील ऐतिहासिक महत्व जाणुन घ्यावे,म्हणून मी आपणास विनंती करतो की, चांगदेव मंदिराचा इतिहास जाणून घेऊन, सरकारी विचार विनिमय करुन त्या बाबतच्या ऐतिहासिक वास्तवते-नुसार किंवा कागदपत्रांनुसार दप्तरी नोंद असणाऱ्या कागदपत्रांची वास्तवता लक्षात घ्यावी.[३]

त्यानंतर १८ नोव्हेंबर १९३० रोजी गृह विभागाने पूर्व खानदेश कलेक्टरला पत्र पाठवून चांगदेव मंदिराबात माहिती मागविलेली दिसून येते. गृह विभाग आपल्या पत्रात म्हणतो, मि.घाटगेंच्या देऊळ बाबतच्या ऐतिहासिकहकीकती बाबतच्या पत्रानुसार, पुरातत्व विभागाने मंदीरताब्यात घेतल्यापासून, तेथील पंचांनी व्यवहारिक दृष्टया काहीही केलेले नाही. याविषयी कोणतीही शंका नाही. पुरातन इमारतींचे जतन करण्यासाठी करण्यात आलेला १९०४ चा कायदा दुर्लक्षून चालणार नाही, विशेष करुन या मंदिराच्या बाबतीत सरकारने काढलेल्या आदेशाद्वारे जी.डी.नं.२४३२ दि.३/४/१९१६ आणि अध्यादेशाद्वारे नमुद केलेला क्र.८६५३ दि.२३/१२/१९१६ सरकारने लक्षात घेतले की, या मंदिराविषयी हिंदू आणि अस्पृश्य यांच्यातील या मंदीराविषयीचा वाद सोडविणे शक्य व्हावे हे व पुन्हा असा प्रसंग घडल्यासहे धोरण अंमलात आणावे म्हणून या गोष्टींची माहीती हवी.

१ आजचे पंच कोण कोण आहेत.
२ जेव्हा जागा रिक्तहोतात त्यावेळी पंचांची नेमणूक कोण करतो.
३ आज ते कोणते महत्वाचे काम त्यांच्यामार्फत केले जाते.
४ हे कार्य एक किंवा सर्व मिळूनन करणारे कार्याचा एखादा विषय काय आहे.[४]

गृह विभागाच्या पत्राला पूर्वखानदेश कलेक्टरनेचांगदेव मंदिरातील पंचाबाबत माहीती कळविलेली दिसतेती अशी की, मंदिरात आज पाच पंच आहेत.या सन्माननीय व्यक्तींची निवड ही गावकऱ्यांच्या सभेत १९१४ साली झाली आहे.कलेक्टरच्याविनंतीचा परिपाक म्हणजे ५०० रु.मंदीराच्या दुरुस्तीसाठी जमा करावेत.पंचानाच भविष्यात रिकाम्या होणाऱ्या जागी नवीन पंच कसे नेमावेत याची कल्पना नाही.म्हणूनहेस्पष्टच आहे की, कोणतीही पारंपारिक पध्दत नवीन पंचाच्या नेमणूकीबाबत नाही.१९१४ पूर्वी कोणीही पंच नव्हते आणि मंदिराची देखभाल पारंपारिक पध्दतीने गुरव पाहत असत. मि.घाटगे यांच्या पत्रावरुन आपणास जाणवते की मारुती गजु पाटीलहे एक पंच होते. ज्यांना सरकारकडून २३ रु.वार्षिक मानधन मिळत असे.त्यामिळालेल्या रकमेत खेडयातील लोकांची वर्गणी मिळून विनियोग ते त्या जागी येणाऱ्यासाधुंसाठी करीत असत. मि.घाटगे म्हणतात, की मारुती गणू पाटीलयांच्या वडीलांकडे तशीसनदहोती. जी आज सापडत नाही. परंतू असे दिसते की आजचे पंच केवळ मंदिराच्या दुरुस्ती इमारतीची देखभाल करतात, १९१६ पासून जेव्हा नवीन दरवाजे बनविण्यात आलेते केवळ मागून अस्पृश्यसत्याग्रहींना मंदीर प्रवेश करता येऊ नये व अंगणतील दरवाजे काढण्यात आले आणि दरवाजे कोणीतयार केले, पंचांनी कदाचित तयार केले असतील, आणि पुरातत्व विभागाची परवानगी हा बदल करण्यासाठी घेतलीहोतीकिंवा नाही. आता मात्र वाटते ही बाब आज पुरातत्व विभागाच्या देखरेखीत आहे आणि `ए`दरवाज्याविषयी चौकशी करता जर पुन्हासत्याग्रह सुरु झाला तर काय धोरण आखावे, सत्याग्रहाच्या चळवळींची परवानगीचे नुतनीकरणसही करुन अगोदरचसत्याग्रहींच्या बाजूने अस्पृश्य कार्यकर्त्यांनी करवून घेतले आहे आणि असे वाटते इच्छाही आहे की, पर्वती केससारखी निश्चित आज्ञा याबाबत व्हावी.[५]

पूर्वखानदेश कलेक्टरने चांगदेव मंदिराबाबत व्यवस्थापक पुरातत्व विभागाला पत्र पाठवून मंदिराबाबत खुलासा मागिविलेला दिसून येतो.ते आपल्या पत्रात म्हणतात, व्यवस्थापक, पुरातत्व विभाग, पश्चिम मंडळसरकारला विनंती करुन कच्या रुपरेषेत चांगदेव मंदिराचे अंगण दाखविले आहे एदलाबाद (मुक्ताईनगर) जवळ जे पूर्वखानदेश जिल्हयात, त्याच्या सर्व संपर्कासह आणि पत्रासह जोडलेल्या परिच्छेदाचा संदर्भ अस्पृश्यांच्या वस्तुस्थितीच्या हक्काबद्दल मंदिराच्या अंगण परिसरात प्रवेशाबद्दल, नवीन दरवाजे हे अस्पृश्यांना मंदीर प्रवेशाबद्दल हिंदूंनी बंद केले आहेत की काय ? ज्यात प्रत्यक्ष जागा नकाशात दाखविण्यात आलेली आहे, आणि ज्याचा पुरवठा आणि मान्यता ही पुरातत्व विभागाने दिली आहे, असल्यास केव्हा आणि कोणत्या प्रसंगात ?

पुरातत्व विभागाच्या अधिकाराखाली चांगदेव मंदीराच्या इमारतसुरक्षित आहे. व्यवस्थापक म्हणून राज्यास विनंती केली आहे ी,

१ हे त्यांच्या विभागास यात रस आहे का किंवा त्यावर नियंत्रण रहावे, त्याची सभासद मंडळी आणि
२ ज्यांच्याकडे काही यास बळकटी देणारे काही कागदपत्रे आहेत की, नवीन दरवाज्यांची व्यवस्था रण्यापूर्वी, ज्याचा उल्लेख वर आला आहे, अस्पृश्य, कुंपणाच्या आंत जात होते आणि अंगणात, आणि देवांची भक्ती करायचे इ. येथपासून
३ या उल्लेखाचा लवकरात लवकर उत्तर द्यावे.

चांगदेव मंदिराच्या अंगण अस्पृश्यांच्या प्रवेशाबाबतचा वास्तवादी हक्कांच्या टिपणीचा परिच्छेद.

मंदिराच्या कुंपणाच्या भिंतीत तीन दरवाजे आहेत.एक उत्तरेकडे, एक पूर्वेकडे आणि एक दक्षिणेकडे या सर्व दरवाज्यातून मूर्तीचे दर्शनहोते.

हिंदूचे म्हणजे आहे की, अस्पृश्यांनी देवाची भक्ती आणि भेटी इ.हया पूर्वेच्या दरवाजातून कराव्यात.याचा अर्थ त्यांनी बाहेरुन कुंपणापासून करावेत.

महारांचे म्हणणे आहे की, ते कुंपणाच्या आत जात असत आणि अंगणात आणि देवाची भक्ती तेथून करत.म्हणजेत्यांनी मान्य केले आहे की, ते मंदिराच्या मुख्य इमारतीत जात नसत.

हिंदूनी नवीन दरवाजे तयार करुन आणि त्यांना मागिल प्रस्तावित सत्याग्रहापासून बंद केले आणि आता ते म्हणतात की, अस्पृश्यांना अंगणात देखील जाण्याचा अधिकार नाही.

मीहे पाहीलेले आहे की, दरवाजे यापूर्वी कधीही बंद नसत. अस्पृश्य हिंदूच्या मंदिरात अंगणात जाऊ देत असत. म्हणून महार जे म्हतातते सत्य आहे आणि अस्पृश्य हे अंगणात जाऊ शकतात, परंतु मुख्य मंदिरात कधीच गेले नाहीत ज्या ठिकाणी मूर्ती स्थापित आहेत.[६]

चांगदेव मंदिराबात पूर्वखानदेश कलेक्टरला पुरातत्व विभागाने कळविलेली माहीती पुढीलप्रमाणे आहे, दि. १९ फेब्रुवारी १९३१ संदर्भानूसार, मी चांगदेव मंदिराचा एदलाबाद जवळील अंगणासह दिसणारा आणि सर्व संपर्क असणारा नकाशा यासह जोडतो. आणि कथन करतो की, मंदिराचे सर्व ४ दरवाजे ए, बी, सीसह खुणवून आणि डी, ए मंदिरासाठी योग्य आणि उरलेले अंगणासाठी. मुख्य दरवाजा बी या खुणे जवळ आहे.परंतू ए, सी आणि डीसडलेले आहेत आणि बऱ्याच वर्षापासून अदृश्य आहेत.प्रस्तावित सत्याग्रहामुळेहे दरवाजे पुन्हातयार करण्यात आलेले आहेत अशीहकीकत एक्झीक्यूटीव इंजिनिअर खानदेश विभाग यांनी आत्ता दिलेले आहे.या विभागाने किंवा सार्वजनिक बांधकाम विभागानेही याविषयी सल्लामसलत केलेली नाही.मंदिराचा धार्मिक उपयोग आहे आणि दरवाजे नवीन करणे गृहीत धरुन, प्रश्न असा आहे, कदाचित काही भक्तगणांनी हे केलेले असावे.अर्थात त्यावर नियंत्रण सरकारचे क्लास II अधिकाऱ्याकडेहोते. आणि म्हणूनहया विभागाची किंवा एक्झीक्यूटीव इंजिनिअर पूर्वखानदेश विभागाची परवानगी या कामी घ्यायला हवी होती जे काम वर उल्लेखित आहे. कशासाठी अस्पृश्यांनी मंदिर इमारतीत प्रवेश परवान ी द्यावी हा मुद्दा पूर्वखानदेश जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारीत येतो, ज्यास काहीही एक माहीती नाही.[७]

हविभागाने व्यवस्थापक, पुरातत्व विभागाला पाठविलेल्या पत्रानुसार, मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो ी, पत्रव्यवहार शेवटचे पत्र क्र.१२५५ ३० एप्रिल १९३१ चे आणि सांगतो की गव्हर्नर इन कौन्सीलने यास सहमती दर्शवून जेव्हापासून चांगदेव मंदिरहे पुरातत्व विभागाच्या देखरेखीखाली आहे, मंदिराच्या पंचानीहेतीन नवीन दरवाजे बनविण्या अगोदर जेसडलेलेहोते. एकतर पुरातत्व विभागाची किंवा इक्झीक्युटीव इंजिनिअर विभाग पूर्वखानदेश यांची अगोदर परवानगी घ्यायला हवी होती.म्हणून मी आपणास विनंती रतो की, आपण पंचाचेहया बाबत काय म्हणणे आहे या बाबत तात्काळ कार्यवाही कराल.

अशाप्रकारे भविष्यात घडू नयेत म्हणून गव्हर्नर इन कौन्सील ठरविते आहे की, तात्काळ कार्यवाही आणि काही विशिष्टसूचना मार्गदर्शन पंचाना व्हावे आणि त्यचे कार्यस्पष्टपणे व्हावा म्हणूनस्पष्टपणे व्याख्या व्हावी. मी आपणास विनंती करतो की, आपण दयाळूपणे पुढील कार्यवाही कराल, जिल्हाधिऱ्यांशी या बाबत चर्चाकराल, पूर्व जिल्हा खानदेश आणि सेंट्रल विभागाचे कमिश्नर आणि सरकारलातात्काळसरकारलाहीहकीकत कळवा.

असे दिसते की, अगोदरचे बांधकाम हे नवीन दरवाज्यांने अस्पृश्य हे देऊळाच्या अंगणात प्रवेशीत होत आणि देवाची भक्ती करीत. परंतु गव्हर्नर इन कौन्सील असा विचार करतात की, जेव्हापासून मंदिरहेसरकारच्या देखरेखीखाली आहेतरत्याचे कर्तव्य होते कीत्यांनी मंदिराची अवस्था सुव्यवस्थीत ठेवावी ज्यामुळे अस्पृश्यांचे अधिकार रहावेत.[८]

निष्कर्ष :-

सारांशाने विचार करता असे लक्षात येते की, चांगदेव येथील मंदिरात अस्पृश्यांना लांबुन काहोईना पण दर्शन घेण्याची व्यवस्था होती. परंतु मंदिर प्रशासनाने यात स्वतः निर्णय घेऊन व पुरातत्व विभागाला अंधारातठेऊन इतर जे तिन दरवाजे होते. ज्यातून अस्पृश्यांना दर्शन घेता येतहोतेते बंद केले. त्यामुळे आता त्यांना लांबुन संरक्षण भितींच्या बाहेरुन दर्शन घ्यावे लागत होते.त्यामुळे त्यांचा पुर्वापार असलेलाहक्क डावलला गेला असल्यामुळे आपल्याला मंदिरात प्रवेश मिळावा पाहीजे यासाठी अस्पृश्यांनी एक दिवसाचा काहोईनासत्याग्रह केला.त्यामुळे मंदिराबाबत सखोल चौकशी केली गेली.

संदर्भ सूची :-

1. Home Dept. (Spl.) File, No.355 (64) IV-B, 1931, Maharashtra State Arachives, Mumbai, Date-10 May 1930
2. Home Dept. (Spl.) File, No.355 (64) IV-B, 1931, Maharashtra State Arachives, Mumbai, Date-22 May 1930
3. Home Dept. (Spl.) File No. 355 (64) IV-B, 1931, Maharashtra State Arachives, Mumbai, Date-1 June 1930
4. Home Dept. (Spl.) File No. 355 (64) IV-B, 1931, Maharashtra State Arachives, Mumbai, Date-18 Nov. 1930
5. Home Dept. (Spl.) File No. 355 (64) IV-B, 1931, Maharashtra State Arachives, Mumbai, Date- 24 Nov. 1930
6. Home Dept. (Spl.) File No. 355 (64) IV-B, 1931, Maharashtra State Arachives, Mumbai, Date- 19 Feb. 1931
7. Home Dept. (Spl.) File No. 355 (64) IV-B, 1931, Maharashtra State Arachives, Mumbai, Date- 30 April 1931